निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९२ वा.
सोमवार - १५ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

प्रशासन करत आहे डोळे झाक, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## गंगापूर शहरात स्वच्छतेचे वाजले तीन तेरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर शहरातील गोदावरी कॉलोनी येथे अनेक दिवसांपासून नगर परिषद कडून नागरिकांना पिण्यासाठी पाणी पुरवठा करणरी जलवाहिनी फुटली आहे. तसेच या परिसरातील सांड पाणी रस्त्यावर वाहत आहे. तसेच काही नागरिकांच्या घरासमोर मोठ्या प्रमाणात फुटलेल्या जलवाहिणीचे व सांड पाण्याचे डबके मोठ्या प्रमाणात साचलेले आहे. यामुळे या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सध्या पाऊसाळ्याचे दिवस सुरू आहे या ठिकाणी जलवाहिणी व सांड पाण्याचे डबके सासल्यामुळे मोठ्या प्रमाणात डास मच्छर होऊन नागरिकांना अनेक आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व तसेच याठिकाणी सांडपाण्याचे सासलेले डबके मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. याकडे नगरपालिका प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. तसेच या ठिकाणी फुटलेल्या जलवाहिणीचे व सांड पाण्याचे तात्काळ व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे. तसेच येथील नागरिकांनी सांगितले आहे की नगर परिषद प्रशासनाकडे तोंडी व लेखी तक्रार केली आहे. परंतु प्रशासनाने अद्याप दखल घेतली नाही प्रशासन या प्रकरणाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच गोदावरी कॉलोनी येथे स्वच्छतेचे वाजले तिन तेरा. नगरपालिका प्रशासनाकडून काय कारवाई करण्यात येईल याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.



महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे पत्नी दर्शना देवी यांच्यासमवेत आज मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील राज्यपाल देवव्रत यांचे स्वागत केले. कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, रेल्वे पोलीस महासंचालक प्रशांत बुरुडे, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आँचल गोयल तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दैनिक आत्ताच एक्सप्रेसच्या पाठपुराव्याला यश

## कडेठाण चौफुली ते गेवराई मर्दा रस्त्याच्या कामाचे उदघाट्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** एखाद्या गावातील नागरिकांना किती मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत असेल,हे अनुभवायचे असेल तर त्यासाठी पारुंडी चौफुली,गेवराई मर्दा मार्गे कडेठाण तिन ते चार किलोमीटर रस्त्याची सफर करावी. रस्त्याची दुर्दशा इतकी की, रस्त्यावर खड्डे की खड्यात रस्ता असा प्रश्न प्रवाश्यांना पडल्याशिवाय राहणार नाही. पारुंडी चौफुली, गेवराई मर्दा, मार्गे कडेठाण गावातील नागरिकांचा वावर असणारा चार किलोमीटरचा हा रस्ता,









भारत स्वातंत्र्य झाल्यापासून एक वेळा झाला आहे. त्या नंतर कधीच दुरुस्त झाला नव्हता.तर कधी रस्त्यावर खडी किंवा खडीवर मुरूम पण नव्हता.

पैठण विधानसभा मतदार संघाचे आमदार विलासबापू भुमरे यांच्या प्रयत्नातून व शिंदेगटाचे सरपंच विक्रम जायभाये यांच्या सततच्या पाठपुराव्याने गेली अनेक वर्ष रखडलेल्या गेवराई मर्दा रस्त्याच्या कामाला सुरवात झाली आहे.गेली काही वर्ष या रस्त्याचे काम रखडल्यामुळे अबाल वृद्ध महिला, विद्यार्थी यांना याच मार्गातून प्रवास करावा लागत होता, तसेच वाहन चालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत होती. अखेर या रस्त्याच्या कामाला सुरवात झाल्यामुळे गेवराई मर्दा, कडेठाण येथिल नागरिकांना दिलासा मिळाला असून, लवकरच हा रस्ता तयार होऊन या रस्त्याचा लोकार्पण सोहळा खासदार संदीपान भुमरे व आमदार विलासबापू भुमरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

**दैनिक आत्ताच एक्सप्रेस ने खड्यात रस्ता कि रस्त्यात खड्ड**

गेवराई मर्दा चा रस्ता कायम प्रतीक्षेत....=ज गेवराई मर्दा शालेय बस ला खड्याचा आहेर... =जपव्हणे पण विचारतात तुमच्या गेवराई गावचा रस्ता झाला का नाही.... अश्या विविध मथळ्या खाली दोन तिन वर्ष सतत बातम्या छापत सतत पाठपुरावा करत गावकऱ्यांचे वेळोवेळी सहकार्य मिळत गेल्याने आज आज रोजी या कामाचा शुभ मुहुर्त लागला नारळ फोडून कामाला सुरवात करण्यात आली. जयवंत चव्हाण (सेवानिवृत्त एसटी डेपो मॅनेजर) सौ. शारदाबाई जयवंत चव्हाण(माजी सरपंच) गोविंद चव्हाण(सेवानिवृत्त तहसीलदार) विक्रम जायभाये(सरपंच) अंकुश राठोड(उपसरपंच) विष्णू गर्जे (रस्ता देखरेख अधिकारी),सुरेश राठोड, कृष्णा राठोड, शाबूद्दीन सय्यद यांच्या उपस्थितीमध्ये नारळ फोडून उदघाट्न करण्यात आले.

**डागडुजीच्या नावाखाली चालायची फक्त कागदावरची मलमपट्टी.**

गेवराई मर्द गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या गावचा रस्ता खड्डेमय असल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा तर लागतोच. मात्र या गावांना येणारे पाहुणे सुद्धा रस्ता दुरुस्त झाला काय ? असे विचारून गावात येणे टाळत होते. उखडलेला, खड्डेमय रस्ता आणि रस्त्यावरील भलेमोठे खड्डे यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत होती. आपत्ती काळात रुगांना आणि प्रसूतीसाठी महिलांना आडुळ येथे उपचारासाठी आणणे देखील जिकरीचे झाले होते. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणसाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना व महाराष्ट्र शासनाच्या लालपरी बसला देखील या खड्यांचा त्रास सहन करावा लागत होता तो प्रवास आता सुखरूप होणार आहे.

गेली अनेक वर्षापासून चौफुली ते गेवराई मर्दा मार्गे कडेठाण रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती. याच रस्त्यातून आमच्या येथिल नागरिकांना प्रवास करावा लागत असल्यामुळे बऱ्याचदा रस्ता खचून छोटे मोठे अपघात घडलेले आहेत. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत आमदार विलास भुमरे यांच्या अथक प्रयत्नातून या रस्त्याला सुरवात झाली आहे ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे

**- विक्रम जायभाये (सरपंच)**

गेवराई मर्दा कडेठाण खुर्द ग्रामपंचायत गेवराई मर्दा ते बक्षीसवाडी रस्त्याच्या कामाला सुरवात झाली असून खडी, रोलिंग सिमेंट येकंदरीत पाहता कामाचा दर्जा उत्तम प्रकारे व गुणवत्ता पूर्वक होणार आहे..

**-विलासबापू भुमरे-**
**आमदार पैठण विधानसभा**

**डागडुजीच्या नावाखाली चालायची फक्त कागदावरची मलमपट्टी.**

गेवराई मर्द गाव म्हणून गावचा रस्ता खड्डेमय असल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा तर लागतोच. मात्र या गावांना येणारे पाहुणे सुद्धा रस्ता दुरुस्त झाला काय ? असे विचारून गावात येणे टाळत होते. उखडलेला, खड्डेमय रस्ता आणि रस्त्यावरील भलेमोठे खड्डे यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. आपत्ती काळात रुगांना आणि प्रसूतीसाठी महिलांना आडुळ येथे उपचारासाठी आणणे देखील जिकरीचे झाले होते. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणसाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना व महाराष्ट्र शासनाच्या लालपरी बसला देखील या खड्यांचा त्रास सहन करावा लागत होता.

## शिरूर घाटच्या शाळकरी विद्यार्थ्यांना करावी लागते गुडघाभर चिखलातून पायपीट

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज (प्रतिनिधी)** शिरूर घाट ते पिंपळगाव हा रस्ता निजाम काळापासून नकाशावर असला, तरी प्रत्यक्षात तो रस्ता अद्याप पर्यंत व्यवस्थित झाला नाही. या रस्त्यावर झालेली अतिक्रमणे तसेच काही शेतकऱ्यांनी मुद्दाम केलेली आडवा-आडवी यामुळे हा रस्ता वापरण्यासाठी बंदिस्त झाला आहे.हा रस्ता तात्काळ करण्यात यावा अन्यथा विद्यार्थ्यांसह पालक आत्मदहन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

गावातील ९०% शेतकरी, शेतमजूर व जनावरे यांची जीवनवाहिनी असलेला हा रस्ता न झाल्यामुळे हजारो हेक्टर जमीन शेतीयोग्य असूनही पडीत टाकावी लागत आहे. पिके घेण्यात मोठ्या अडचणी येत आहेत.



**स्वातंत्र्याला ७८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही पांदण रस्ता ही अपूर्णच**

याच रस्त्यालगत असलेली आवाड वस्ती, गीते वस्ती, केकान वस्ती येथील ग्रामस्थ व शाळकरी मुले दररोज ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करत आहेत. रस्त्याच्या अभावामुळे कित्येक आजारी जनावरांना वेळेवर डॉक्टर न मिळाल्याने ती दगावली आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांनी तहसीलदार, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद सदस्य, आमदार यांच्याकडे वारंवार निवेदने दिली आहेत. परंतु आजपर्यंत कोणीही याकडे लक्ष दिले नाही.

निवडणुकांच्या काळात अनेक आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्ष कामासाठी कोणीही पुढे आले नाही. उलट, कोणी प्रयत्न केला तरी त्यावर राजकीय दबाव टाकून आडवा-आडवी करून काम बंद पाडले जाते. हे सगळं गावातील गलिच्छ राजकारणा मुळे घडत असल्याच्या प्रतिक्रिया गावकऱ्यांनी दिले आहेत

नंदकुमार मोराळे यांनी गावकऱ्यांशी चर्चा करून रस्ता करण्याचा प्रयत्न केला आणि काम सुरूही केले. परंतु काही लोकांनी मुद्दाम अडथळे निर्माण करून ते काम पुन्हा थांबवलेले आहे

या प्रश्नावर सरपंच वैजनाथ सांगळे यांनी तहसील कार्यालयाला रस्ता मोजणीसाठी पत्रव्यवहार केला होता. परंतु राजकीय दबावामुळे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले व दिलेल्या तारखेला अधिकारी उपस्थित राहिले नाहीत.सध्याच्या परिस्थितीत गावातील नागरिक अतिशय हतबल झाले आहेत. जर प्रशासनाने याची दखल तातडीने घेतली नाही, तर ग्रामस्थ विद्यार्थ्यांसह आत्मदहन करण्याच्या मनस्थितीत आहेत. प्रशासकीय यंत्रणा, कर्तव्यदक्ष तहसीलदार यांनी या प्रश्नांकडे लक्ष वेधून तात्काळ या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात आली आहे.



## तिरुपती आंध्र प्रदेश येथील संसदीय कायदेविषयक राष्ट्रीय परिषदेस कन्नच्या आमदार सौ.जाधवांची उपस्थिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /उदय कुलकर्णी /** आंध्र प्रदेश तिरुपती येथे संसदीय व कायदेविषयक समित्यांच्या महिला सक्षमीकरणावरील पहिली राष्ट्रीय परिषद नुकतीच यशस्वीरित्या पार पडली. या पार पडलेल्या परिषदेला कन्नडच्या शिवसेना आमदार सौ.संजनाताई जाधव सह महाराष्ट्रातील दोन महिला खासदार, तसेच समिती प्रमुख आमदार मोनिकाताई राजळे, आमदार सीमाताई हिरे, आमदार प्रज्ञाताई सातव, आमदार सरोजताई अहिरे, सचिव मेघनाताई तळेकर आणि अवसचिव प्राजक्ताताई कुलकर्णी उपस्थित होत्या.

या पार पडलेल्या परिषदेच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक सक्षमीकरणासंदर्भात महत्त्वपूर्ण विचारमंथन करण्यात आले.या परिषदेस विविध राज्यांमधील मान्यवर सदस्यांनी महिलांना न्याय, समान संधी आणि सुरक्षिततेसंदर्भात प्रभावी उपाययोजना व धोरणांवर चर्चा केली.

आंध्र प्रदेश तिरुपतीतून सुरू झालेला हा उपक्रम आगामी काळात संपूर्ण देशातील महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवेल, असा ठाम विश्वास तयार झाला आहे.

# अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# मांजरा धरणाचे दोन दरवाजे ०.२५ मिटरने उघडले,नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे प्रशासनाचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** केज तालुक्यातील मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेच्या उंबरठ्यावर पोहोचला असून दि.१३ सप्टेंबर २०२५ दुपारी १६.१५ वाजेपर्यंत प्रकल्पातील जलसाठा ९९.२१ टक्के इतका झाला आहे.गेल्या काही दिवसांपासून पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरूच आहे.धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरण प्रशासनाने आज दुपारी नियंत्रित पाणी विसर्ग सुरू केला आहे.



प्रकल्प प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार,शनिवारी दुपारी १६.१५ वाजता धरणातील क्रमांक १ आणि ६ वक्रद्वारे प्रत्येकी ०.२५ मीटर उंचीने उघडण्यात आले असून,मांजरानदीपात्रात एकूण १,७४७.१४ क्यूसेक्स (४९.४८ क्यूमेक्स) इतक्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले आहे. ही विसर्गाचीसुरुवातीची पातळी असून धरणात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणानुसार विसर्गात आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट केली जाणार आहे.

दरम्यान, प्रशासनाने नदीकाठा वरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पुरनियंत्रण कक्षाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या सूचनेत,नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे,कोणीही नदीपात्रात प्रवेश करू नये.

जिवीत अथवा वित्तहानी टाळण्यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे असे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांत प्रकल्प परिसरात आणि पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणातील पाणी साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्यामुळे प्रशासन धरणातील पाणी पातळी सतत लक्षात ठेवून नियंत्रित विसर्ग करून नदीकाठावरील गावांना इशारे देत आहे.

तज्ज्ञांच्या मते,येत्या काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणातून होणाऱ्या पाणी विसर्गाचे प्रमाण वाढू शकते.

यामुळे नदीकाठा वरील गावांनी प्रशासनाशी संपर्कात राहून सुरक्षित स्थळी स्थलांतराची तयारी ठेवावी,असा सल्लाही तज्ज्ञांकडून देण्यात आला आहे.

# संघर्ष शेतकरी संघटना महाराष्ट्र यांची नादरपुर येथे बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी**/संघर्ष शेतकरी संघटना,महाराष्ट्र यांची एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संस्थापक अध्यक्ष पंढरीनाथ गोडसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात आणि यशस्वीपणे संपन्न झाली. बैठकीत शेतकऱ्यांच्या सध्याच्या अडचणी, शासनाची धोरणे आणि संघटनेच्या आगामी रणनीतीवर सखोल चर्चा करण्यात आली.शेतकऱ्यांच्या सर्कल प्रमुख रुपेश चौधरी,तसेच आनंद भाऊ देशमुख,कन्नड युवक तालुकाध्यक्ष दिलीप गायकवाड,सुरेश निकम आणि जिल्हा प्रशासकीय अधिकारी दिलीप निकम यांची विशेष उपस्थिती होती.

सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली आणि संघटनेच्या माध्यमातून एकसंघपणे लढा देण्याची गरज व्यक्त केली.



मालाला हमी भाव,सध्या ज्वलंत असलेला शेती कर्ज माफी प्रश्न अशा विषयाला निस्वार्थी पणे लढा उभा कसा करता येईल यावर विचार मंथन करण्यात आले.

या बैठकीला मराठवाडा अध्यक्ष बाळासाहेब भूमे, मराठवाडा सचिव नरहरी गोरे,जिल्हा उपाध्यक्ष शुभम देशमुख व रामेश्वर मोरे,आरोग्य प्रमुख रवींद्र कीर्तिशाही,सिल्लोड तालुकाध्यक्ष युवराज मोरे, रत्नपूर तालुका संपर्कप्रमुख सुनील आहेवाड, आमठाणा

या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमुळे आगामी काळात संघटनेच्या कार्यात नवी ऊर्जा व दिशा मिळणार असल्याचे चित्र दिसून आले.यावेळी संघटनेच्या कन्नड तालुका विविध पदावर नियुक्त्या अध्यक्ष गोडसे पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवडी करण्यात आल्या.या वेळी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.छायाचित्र सुनिल निकम

# भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयातील विद्यार्थ्यांचे नेत्रदिपक यश

## ऑलिम्पियाड परीक्षेत मिळवली ३१ सुवर्णपदके

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** भराडी सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन नवी दिल्ली तर्फे आयोजित इंटरनॅशनल इंग्लिश ऑलिम्पियाड व इंटरनॅशनल हिंदी ऑलिम्पियाड परीक्षेत श्रीमान अशोकदादा गरुड शैक्षणिक समूह स्पर्धेतून, विद्यालयाचे इंग्रजी व हिंदी विषयात अनुक्रमे ४३ व ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. घेण्यात आलेल्या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सुवर्णपदके व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. इयत्ता १ ली पासून ते बारावी पर्यंतच्या बाहेर जाऊन विद्यार्थ्यांच्या विश्लेषणात्मक कौशल्यांची आणि तर्कशक्तीची परीक्षा पाहण्यासाठी या परीक्षा घेतल्या जातात.

संस्थेचे प्रमुख श्रीमान अशोकदादा गरुड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना



सिल्लोड संचलित ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालय भराडी येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन करीत ३१ सुवर्णपदके मिळवली. याप्रसंगी राष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या विषयाच्या परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना सतत प्रेरित करणाऱ्या ऑलिम्पियाड विद्यार्थ्यांना या परीक्षेत सहभागी होता येते.बहुपर्यायी स्वरूपाची ही परीक्षा जनरल नॉलेज,इंग्रजी,गणित, विज्ञान,सामाजिक शास्त्र,संगणक अशा विविध स्वरूपातून घेण्यात येते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ऑलिम्पीयाड परीक्षा उपयुक्त ठरतात. पारंपारिक शालेय अभ्यासक्रमाच्या अधिक प्रकारच्या स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपले ज्ञान तपासत राहण्याचे आवाहन केले.यावेळी श्रीमान अशोकदादा गरुड यांच्यासह ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक,सहशिक्षकवृंद,शालेय वाहनचालक मालक यांची उपस्थिती होती.

# परळीत होणाऱ्या भव्य एल्गार महासभेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहा -लिंबराज गायकवाड

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** आपल्या हक्कासाठी, संघर्षासाठी सतत लढणारे श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र, युवकांचे हृदयसम्राट आदरणीय सुजातदादा आंबेडकर पहिल्यांदाच परळी शहरात सोमवार दि २९ सप्टेंबर रोजी आगमन करीत आहेत. वंचित समाजाच्या आवाजाला बळ देणारा हा ऐतिहासिक क्षण ठरणार असून, त्यांच्या स्वागतासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भव्य एल्गार महासभेचे आयोजन करण्यात आले आहे.या महासभेचे उद्घाटक युवा नेते प्रा. किसन चव्हाण राष्ट्रीय महासचिव असणार असून मार्गदर्शनासाठी फारूख अहमद राज्य उपाध्यक्ष,प्रवक्त्या सविताताई मुंडे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी शैलेश कांबळे बीड पूर्व जिल्हा अध्यक्ष, अजय सरवदे बीड पश्चिम जिल्हा अध्यक्ष, बाबुराव मस्के बीड पूर्व युवा जिल्हा अध्यक्ष तर कार्यक्रम अध्यक्षपदी मिलिंद घाडगे बीड जिल्हा महासचिव राहणार आहेत.प्रमुख उपस्थितीत खंडुनाना जाधव बीड जिल्हा पश्चिम महासचिव, प्रसन्नजीत रोडे बीड जिल्हा उपाध्यक्ष, ड.संजय रोडे बीड जिल्हा सहसचिव, बालासाहेब जगतकर बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख, सचिन उजगरे बीड जिल्हा उपाध्यक्ष धम्मानंद कासारे बीड हे नेते सहभागी होणार आहेत.परळी शहरात होणाऱ्या भव्य एल्गार महासभेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते लिंबराज गायकवाड यांनी केले आहे. सुजातदादा आंबेडकर यांच्या स्वागताला ऐतिहासिक रूप द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# भोकरदन येथे आम आदमी पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक संपन्न!

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/प्रतिनिधी**/भोकरदन येथे जालना जिल्हा आम आदमी पार्टीच्या जिल्हा कार्य करण्याची मीटिंग ठेवण्यात आली होती या मीटिंगमध्ये जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी भाग घेतला त्यामध्ये सर्वांचे मनोगत ऐकून घेण्यात आले वेगवेगळे विषयावर सर्व सदस्यांनी आपले मते मांडले जिल्ह्यातील शिक्षणाचा प्रश्नाबाबत पार्टीने केलेले आंदोलन पार्टीने वेगवेगळे केलेले आंदोलने यावर प्रकाश टाकण्यात आला. नगरपरिषद, पंचायत समिती,जिल्हा परिषद इत्यादी निवडणुका स्वबळावर लढवण्याबाबत चर्चा झाली जनतेमध्ये आम आदमी पार्टी बद्दल सहानुभूती असून अनेक लोकांनी पार्टीला पाठिंबा दिला असल्याचे सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले त्यामध्ये पार्टीच्या कार्यकर्त्यांनी गावागावात केलेल्या दौऱ्याबाबत चर्चा झाली.संघटना बांधणी करण्यासाठी जिल्हा कार्यकारिणीच्या तालुका भेटी देण्याचे ठरले नवीनच नियुक्त झालेल्या असल्यामुळे सर्वांचा सत्कार करण्यात आला. सर्व तालुक्यातील तालुका अध्यक्षांचे अगोदरच्या बॉडी बरखास्त करण्यात आल्यामुळे नियुक्ती रद्द झाल्या असून कोणत्याही तालुकाध्यक्षांनी नवीन नियुक्तीपत्र भेटल्याशिवाय पार्टीच्या लेटर पॅड वर पत्रव्यवहार करू नये असे ठराव पारित करण्यात आला प्रत्येक गावात लोकांच्या घरापर्यंत जाऊन डोअर टू डोअर व्हिजिट नुसार संघटना बांधणी करण्याचे ठरले. कामगारांच्या प्रश्नावर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तसेच जनतेच्या मूलभूत सोयीसुविधाबाबत आम आदमी पार्टी प्रत्येक ठिकाणी संघर्ष करून आंदोलन करेल याबाबत सर्वांचे एकमत झाले. तसेच काही लोकांना पार्टीमध्ये नवीन प्रवेश देण्यात आला.

नवनियुक्त सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष अंकुश कांबळे, जिल्हा सचिव बोरसे गुरुजी, उपाध्यक्ष महेजाद खान,संघटन मंत्री संभाजी शेळके, जिल्हा कार्यकारणी सदस्य पालकर गुरुजी,जिल्हा कार्यकारणी सदस्य दत्तू पडुळे जालना जिल्हा युवा अध्यक्ष सुभाष बोर्डे, पार्टीचे कोषाध्यक्ष, डॉक्टर लालझरे, चंद्रशेखर शर्मा उपाध्यक्ष जालना




तसेच भोकरदन शहरातील कार्यकारिणीचे इब्राहिम कुरेशी, फारुख भाई, बाबर भाई, घाणखेडचे अमोल दांडगे, संतोष बोरसे, श्री ताठे पाटील, सागर चव्हाण,आप्पासाहेब टाके, राजेंद्र सुरडकर, नारायण सोन्नी,सगीर काजी, यांच्यासह सुमारे २०० कार्यकर्त्यांनी पार्टीच्या मिटींगला हजेरी लावली प्रदीर्घ चर्चे नंतर अध्यक्षीय समारोप श्री अंकुश कांबळे यांनी केला बोरसे गुरुजींनी सर्वांचे आभार मानले जेवणानंतर मीटिंग संपन्न झाली.

# मुंबई प्रादेशिक कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर /प्रतिनिधी** / ऑल इंडिया पोस्टल एससी/एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन, मुंबई क्षेत्र च्या वतीने मुंबईतील कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन शिबीर आज दास बंगला टिटवाळा कल्याण येथे आयोजित करण्यात आले.सदर मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र गोवा राज्याचे संघटनेचे सर्कल सेक्रेटरी मा.जयराम जाधव यांनी केले. आपल्या उद्घाटन पर भाषणात श्री. जाधव यांनी उपस्थित कामगारांना संबोधित करताना संघटनेचे महत्व आणि या निमित्ताने आपली एकजुट किती आवश्यक आहे याचे महत्व पटवून दिले.. आपल्या सारखे निष्ठावंत कार्यकर्ते हीच माझी ताकत आहे. त्यामुळे संघटनेच्या पाठी आपण एकदिलाने उभे रहा. मुंबई क्षेत्रातील बारा डिव्हिजन तसेच शेजारील ठाणे, नवी मुंबई ,कराड डिव्हिजन मधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.के. आर.शिलवंत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सर्कल उपाध्यक्ष सर्वश्री, तानाजी कांबळे, नवी मुंबई रिजनल सेक्रेटरी संजय जाधव, ठाणे डिव्हिजनचे सेक्रेटरी प्रविण जाधव, सर्कल ऑर्गनायझेशन सेक्रेटरी प्रविण बनसोडे, दिगंबर सोनवले,असी. सर्कल खजिनदार सुरेश रोडेवाड इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. मुंबई प्रांतातील सर्व डिव्हिजनल सेक्रेटरी यांची तसेच पदाधिकाऱ्यांनी आवर्जून हजेरी लावली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिजनल सेक्रेटरी पीराजी सदावर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन बुद्धभुषण सैनदाणे यांनी केले.

# मोती तलावात आढळला अनोळखी मृतदेह, पोलीस घटनास्थळी दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** शहरातील मोती तलावात आज दुपारच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच चंदनझिरा पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मृतदेह बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले.मिळालेल्या माहितीनुसार जालना शहराला लागून असलेल्या मोती तलावात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी पोलिसांना दिली. पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.ही घटना आत्महत्येची आहे की घातपाताची, याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. पोलिसांकडून मृतदेहाची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू असून, पुढील तपास सुरू आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली होती पोलिसांच्या तपासातून अधिक तपशील समोर आल्यानंतर पुढील माहिती दिली जाईल.



# आरपीएफ टीम ची विशेष मोहीम - १७३ जणांवर कार्यवाही

**आत्ताच एक्सप्रेस/नांदेड/प्रतिनिधी/** नांदेड विभागातील रेल्वे प्रोटेक्शन फोर्स ने रेल्वे परिसरात धुम्रपान करणे, अनधिकृत पार्किंग करणे, अनधिकृत पणे रूळ ओलांडणे, रेल्वे परिसरात अनधिकृत प्रवेश करणे अश्या प्रकरणात १७३ जणांवर कार्यवाही करून माननीय रेल्वे कोर्टासमोर प्रस्तुत केले.औरंगाबाद, आदिलाबाद, जालना, नागरसोल व धर्माबाद पोस्ट तर्फे १३ सप्टेंबर २०२५ रोजी रेल्वे स्थानकावर रेल्वे कायद्याअंतर्गत विशेष मोहिम राबविण्यात आली.या मोहिमेत १७३ जणांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीअंती त्यांच्याविरुद्ध कलम १५९ , कलम १४७, कलम १६७ अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले.सर्व आरोपींना मा. जेएमएफसी/ रेल्वे/औरंगाबाद यांच्या कॅम्प कोर्टात हजर करण्यात आले व त्यांना दंडित करण्यात आले.आरपीएफ प्रवाशांचे सुरक्षित व सोयीस्कर प्रवास सुनिश्चित करण्यासाठी तसेच रेल्वे कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी कटिबद्ध आहे.

# बीडमध्ये बंजारा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या -खा.बजरंग सोनवणे

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/** बंजारा (लमाण) समाजाच्यावतीने बीड येथे दि.१५ रोजी विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासाठी येणाऱ्या बांधवांच्या येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई, यांना दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे, राज्य शासनाने दि. २ सप्टेंबर २०२५ रोजीचा शासन निर्णयानुसार हैदराबाद स्टेट गॅझेटियर स्वीकारले असून, त्या गॅझेटरमधील नोंदीनुसार बंजारा (लमाण) समाज अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात मोडतो. मराठवाडयातील विशेषतः तत्कालीन हैदराबाद राज्याच्या भागातील बंजारा समाजाच्या मागणीसाठी बीड जिल्हयातील संपूर्ण बंजारा समाज बांधवांनी दि. १५ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बोड येथे भव्य विराट मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चामध्ये समाज बांधव मोठ्या संख्येने आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक वाहनाने सहभागी होत आहेत. यामुळे मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी देने आवश्यक आहे. या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल . बीडकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्याच्या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत. असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. दोन दिवसापूर्वी बीड येथे बंजारा समाजातील तरुणांनी सुरू केलेल्या उपोषणाला खा.बजरंग सोनवणे यांनी भेट देत उपोषणकर्त्यांशी संवाद साधला होता. याच ठिकाणाहून आपण बंजारा समाजाच्या सोबत असून आपला या मागणीला पाठिंबा असल्याचेही जाहीर केले होते. यानंतर टोलमाफीसाठी पत्र देऊन सामन्य नागरिकांना टोलपासून



आर्थिक झळ बसू नये यासाठी पत्र दिले आहे.




## जाहीर सूचना

सर्वसामान्यांना कळविण्यात येते की संघर्ष क्रांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, चिंचोली लिंबाजी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० (Maharashtra Public Trust act 1950) कलम १९ अंतर्गत चौकशी प्रलंबित आहे.या संस्थेची खालीलप्रमाणे संपत्ती दर्शविण्यात आलेली आहे :१. चल संपत्ती (Movable Property):सभासद शुल्क रक्कम रु. ७००७/- (सात हजार सात रुपये फक्त) २. अचल संपत्ती (Immovable Property):काहीही नाही.

सदर बाबतीत कोणाला काही हरकती/आक्षेप असल्यास किंवा पुरावे दाखववायाचे असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात आपली हरकत/पुरावे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत.जर वरील कालावधीत काही हरकती प्राप्त झाल्या नाहीत, तर पुढील चौकशी पूर्ण होऊन आवश्यक आदेश दिले जातील.

दिनांक : १८/०८/२०२५

**ठिकाण :** छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरीत/-**
**अर्जदार**
**पांडुरंग कडुबा मागर**

# बँकेचे भाग भांडवलदार व ग्राहक यांच्या अतुट विश्वासामुळे प्रगतीचा आलेख गाठला- रवींद्र संचेती

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ सुयोग वाणी** /दि .वैजापूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १३ रोजी कृष्णा लॉन्स मार्केट यार्ड येथे खेळीमेळीचे वातावरणात उत्स-ाहात पार पडली. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या सभेला सुरुवात करण्यात आली. बँकेचे भाग भांडवलदार व ग्राहक यांच्या अतुट विश्वासामुळे प्रगतीचा आलेख गाठल्याचे प्रतिपादन बँकेचे चेअरमन रवींद्र उर्फ बाळासाहेब संचेती यांनी यावेळी केले. पुढे बोल-ताना संचेती म्हणाले की,बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असून बँकेकडे ५४० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत तर १९० कोटी रुपयांची बँकेने गुंतवणूक केली आहे.

बँकेच्या माध्यमातून आजपर्यंत १४० पेक्षा जास्त गरजू तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला असून कर्जदार व सभासदांसाठी अपघात विमा योजना लागू केल्याची माहिती त्यांनी या सर्वसाधारण सभेत बोलताना दिली. या बैठकीत ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल सभासदांसमोर सादर करण्यात आला. सभेत मांडण्यात आलेल्या १ ते १६ विषयांना सभासदांनी बहुमताने मंजुरी दिली.यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बँकेचे उपाध्यक्ष उल्ह-ास ठोंबरे, ड. प्रमोद जगताप, विशाल संचेती, प्रीतमजी मुथा, विनयजी सुराणा, सुरेश तांबे, विजय वेद ,विजय दायमा, सावनसिंह राजपूत, प्रशांत त्रिभुवन, महेंद्र गुंदेचा, विनोद गायकवाड ,मनोज छाजेड, सौरव संचेती, प्रकाश पीरथानी,






अंकित मालपाणी, शालिनी सोमानी, वैशाली साखरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.सभेचे प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ए.एम.कोठारी यांनी केले तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आभार मानले. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या यशस्वीतेसाठी बँकेचे शाखाधिकारी व्ही. डब्ल्यू.कोरडे, एस. जे.साकला, सी.एम. आवारे, आर.ई.फल्ले, एस.ए.लाहोटी, आर.एन.साळवे, सी.व्ही.शर्मा, एस.आर .सोनवणे, एस.एस. जगताप व समस्त कर्मचारी वृंद यांनी पुढाकार घेतला.

# पोलिस उपनिरीक्षक अंबादास मोरे यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस उपनिरीक्षक अंबादास कचरु मोरे (वय ५६, रा. खिर्डी, ता. खुलताबाद, हल्ली मुक्काम देवगिरी व्हॅली, मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर) यांचे रविवारी (ता. १४ सप्टेंबर) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.



अंबादास मोरे यांनी २०१३ साली पोलिस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली होती.त्यानंतर त्यांची पदोन्नती धाराशिव येथे झाली होती.गेल्या तीन महिन्यांपासून ते खुलताबाद पोलिस ठाण्यात उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते.

रविवारी दुप-ारी त्यांना हृदयविकाराची तीव्र लक्षणे जाणवल्याने एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचा अंतिमसंस्कार सोमवारी सकाळी ११ वाजता मिटमिटा येथील स्मशानभूमीत होणार आहे.

# वेरूळ येथे विश्वकर्मा पूजन दिन व विश्वकर्मीय समाज बांधवांचा राज्य मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने येत्या बुधवार दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास श्रीक्षेत्र वेरूळ येथील प्रभू श्री भगवान विश्वकर्मा मंदिर सभागृहात राज्यातील सुतार,लोहार,सोनार, तांबट, जांगिड,पांचाळ या सूक्ष्म इतर मागासव-र्गीय समाज बांधवांचा राज्यस्तरीय मेळा-वा व विश्वकर्मा पूजन दिन साजरा होणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक प्रा. नागोराव पांचाळ यांनी दिली.

या मेळाव्यास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले असून या चर्चेत सहभागी होणार आहेत.

मायक्रो ओबीसींच्या भल्यासाठी उपयुक्त असणारा रोहिणी आयोगाची त्वरित अंमलबजावणी करावी. ओबीसींची अ ब क ड अशा पद्धतीने वर्गीकरण करावे.ज्या जातींना शिक्षण, आर्थिक,राजकीय व सामाजिक लाभ मिळालेला नाही ते घटक प्रगती पासून वंचित आहेत.त्यामध्ये प्रामुख्याने बारा बलुतेदार यांचा समावेश आहे. हे सर्वच घटक अप्रगत आहेत.त्यांना कसा लाभ मिळवून देता येईल याकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. अशी माहिती संस्थापक प्रा. नागोराव पांचाळ यांनी यावेळी दिली.

विश्वकर्मा वंशीय समाजातील सर्व घटकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे आर्थिक उत्पन्न व रोजगाराचे मार्गदर्शन करणे, सरकारी व निम सरकारी योजनांची माहिती व मार्गदर्शन आणि अंमलबजावणी करण्यासाठी त्रैमासिक कार्यक्रमाचे आयोजन करणे,यासाठी एम.सी.इ. डी. बिटकॉन जिल्हा उद्य-ोग केंद्र या सारख्या संस्थांची मदत घेणे,वधु वर परिचय मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करणे, ओ.बी.सी. व मायक्रो ओ.बी.सी.बद्दल जनजागृती करणे, सभा,संमेलने शिष्ट मंडळ तसेच विश्वकर्मीय समाजातील लोक प्रतिनिधी उदाहरणार्थ खासदार, आमदार, मंत्री,नगरसेवक, जिल्हा परिषद अध्यक्ष,जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य,:सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांचे शिष्टमंडळ घेऊन सरकारला त्याबाबत जाब विचारणे,संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करणे तसेच संघटनेसाठी आर्थिक पाठबळ उभा करणे आणि हे सर्व कार्यक्रम नियमित पणे शिस्तबद्ध पद्धतीने होतात किंवा नाही यासाठी राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी आढावा घेणे, अशी ध्येय धोरणे इथून पुढच्या काळामध्ये विश्वकर्मा समाज संघटनेच्या वतीने राबविली जातील. अशी माहिती विश्वकर्मा पूजन दिन व राज्यस्तरीय अधिवेशनाचे नियोजन समिती अध्यक्ष राजेश नागपुरे यांनी दिली.

यावेळी होणाऱ्या उद्योजकता मार्गदर्शन शिबिरामध्ये पुणे व छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र उद्योजकता विकास महामंडळाचे माजी विभागीय व्यवस्थापक सुदाम नलावडे व सुरेश उमाप हे नव उद्योजकांना उद्योग कसा निवडावा. उद्योग उभारणी कशी करावी, प्रकल्प अहवाल कसा तयार करावा कर्ज घेण्यासाठी कुठले कागदपत्र आवश्यक आहेत, तसेच उद्योग उभारणीसाठी सरकारी आणि निमसरकारी कुठल्या योजना उपलब्ध आहेत या बद्दलची प्राथमिक माहिती देणार आहेत.

विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेने वर्षभर करावयाची कामे, संघटनेची ध्येय धोरणे व त्याची अंमलबजावणी यांची येत्या वर्षभरामध्ये सुयोग्य पद्धतीने कशी करायची याबद्दल या मेळाव्यात राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर माहिती देणार आहेत.या बैठकीस प्रा नागोराव पांचाळ यांच्यासह नियोजन समितीचे अध्यक्ष राजेश नागपुरे,कार्याध्यक्ष अरुण भालेकर, कोषाध्यक्ष गणेश गव्हाणे, उपाध्यक्ष गोपाल राऊत, सचिव विलास पवार, प्रसिद्धी प्रमुख भगवान राऊत, शहर नियोजन समिती अध्यक्ष अमोल डोळस, चंदु हिवाळे, परमेश्वर पांचाळ, बालाजी पांचाळ, व्यंकट पांचाळ गणेश आढाव यांच्यासह संघटनेचे राज्य, विभाग व जिल्हा पातळीवरील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून निबंध आणि चित्रकला स्पर्धा

**मुंबई/प्रतिनिधी/** देशा-चे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजी ७५ वा वाढदिवस आहे. या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यातील सर्व शाळांमध्ये निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.सर्वसाधारणपणे राष्ट्र प्रथम, आत्मनिर्भर भारत, स्वदेश, ऑपरेशन सिंदूर, पर्यावरण हे या स्पर्धांचे विषय असणार आहेत. यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना वाढीस लागेल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे.तालुका आणि जिल्हास्-तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या या निबंध व चित्रकला स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावरील विजेत्या स्पर्धकांना सन्मानपत्र/ प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

# संक्षिप्त

## जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सव

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड/ प्रतिनिधी/** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सव १५ व १६ सप्टेंबर रोजी अंबड येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात होणार आहे. महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती संचालक डॉ.कैलास अंभुरे व प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांनी दिली.यंदापासून जिल्हानिहाय युवक महोत्सव होणार आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते सोमवारी सकाळी दहा वाजता उद्घाटन होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आ. राजेशभैय्या टोपे अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी विद्यापीठाचे माजी बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ .भागवतराव कटारे व प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. बी आर गायकवाड यांची सन्माननीय उपस्थित राहील. तर सिने गीतकार डॉ विनायक पवार व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ भारत खंदारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर मंगळवारी दुपारी चार वाजता समारोप व पारितोषिक वितरण सोहळा होणार आहे. संस्थेचे सचिव मनिषाताई टोपे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. यावेळी अभिनेत्री वैशाली दाभाडे कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, कारखान्याची उपाध्यक्ष उत्तम पवार, सह प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर , प्राचार्य डॉ राजेंद्र गायकवाड, संयोजक प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित संचालक डॉ.कैलास अंभुरे यांच्यासह सल्लागार समितीचे सदस्यांची उपस्थिती राहणार आहे. जालना जिल्हयातील युवक महोत्सवात अंबड येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेत संपन्न होणार आहे. या महाविद्यालयात १५ व १६ सप्टेंबर रोजी या जिल्हयातील महाविद्यालयांचे संघ व सुमारे ४०० विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत. या महोत्सवाचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ.कैलास अंभुरे व प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित यांनी केले आहे.

सहा गटात २८ कला प्रकार यंदाच्या युवक महोत्सवात एकूण पाच गटात २८ कलाप्रकार सादर होणार आहेत. तसेच शोभायात्रा हा स्वंतत्र कलाप्रकारही असणार आहे. कला विभाग व कलाप्रकार पुढील प्रमाणे :-१) संगीत विभाग (दहा प्रकार) - भारतीय शास्त्रीय गायन, भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत, भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य), नाटयसंगीत, भारतीय सुगम संगीत (भा), भारतीय समूहगान (भा), भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद, पाश्चिमात्य गायन, पाश्चिमात्य वाद्य संगीत, पाश्चिमात्य समूहगाय.२) नृत्य विभाग - भारती शास्त्रय नृत्य, भारतीय लोकसमुह ३) नाटय विभाग - एकांकिका, प्रहसन, नक्कल, मूकअभिनय ४) वाङ्‌मय विभाग - वादविवाद, प्रश्नमंजूषा, वक्तृत्व ५) ललित कला विभाग - स्थळचित्र, चिकटकला, पोस्टर मेकिंग, मातीकला, व्यंगचित्रे, रांगोळी, स्थळ छायाचित्रण, इंस्टालेशन, लघुचित्रपट.

## जालन्यात शिवसेना महिला आघाडीचा माझं कुकूं माझा देश' आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस/जालना(प्रतिनिधी)**देशात पहेलगाम येथील निरापराध पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार करुन अनेक भगिनींच्या कपळावरील कुंकू पुसरणार्या व अतिरेक्यांना पोसणार्या देशासोबत केंद्र शासनाने नुकतीच क्रिकेट सामन्यांना परवानगी दिली. यावरुन मोंदी सरकारला पहेलगाम येथील भगिनींच्या कुंकूवाचा विसर पडल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मोदी सरकारच्या विरोधात जालन्यात शिवसेना महिला आघाडीच्या वतीने ऋमाझं कुकूं माझा देश' हे आंदोलन करुन कुंकूवांच्या पेट्या जमाकरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठविण्यात आल्या. आजचे आंदोलन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तर महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगल मेटकर यांच्या नेतृत्वात शहरातील गांधीचमन येथे करण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या वतीने केंद्र सरकार व मोदी विरोधात घोषणाबाजी केली व मोंदी सरकारने आपला निर्णय मागे घ्यावा अशी जोरदार मागणी केली.यावेळी माजी नगरसेविका गंगुबाई वानखेडे, मंजुषा घायाळ, यांच्यासह आदी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ४२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** बँकेच्या बँकेची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची ४२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा १४ सप्टेंबर रोजी बँकेच्या जालना येथील बँकेच्या सभागृहात बँकेचे अध्यक्ष सतिशराव टोपे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे. सभेत सर्वप्रथम बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे यांनी जिल्हयातील उपस्थित सर्व मान्यवर, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी,प्रतिनिधी यांचे स्वागत केले.सभेच्या कामकाजापुर्वी सभागृहात अहवाल वर्षातील दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यानंतर वार्षीक सभेच्या कामकाजास सुरुवात होऊन बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी विषय सुचीनुसार विषयांचे वाचन केले.व सभागृहात उपस्थित सभासदांनी सदरील विषयांस टाळयांच्या गजरात सर्वानुमते मंजुरी दिली. यानंतर मार्च २०२५ अखेर जिल्ह्यातील ज्या वि.का.से. संस्थांनी बँक कर्जाची १०० टक्के कर्ज वसुली केलेली आहे. अशा ५९ वि.का.से. संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन व गटसचिव यांना वार्षीक सभेचे मार्गदर्शक माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे,बँकेचे जेष्ठ संचालक माजी आमदार अरविंद चव्हाण तसेच बँकेचे संचालक मंडळातील सदस्य यांचे हस्ते 'गौरव प्रमाणपत्र' देऊन संस्थेच्या कामकाजास गौरविण्यात आले.यानंतर बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे यांनी बँकेच्या वार्षीक सभेचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वागत केले. तसेच बँकेचे उपाध्यक्ष भिमराव जावळे यांनी बँकेचे संचालक तथा महाराष्ट्र राज्य पंचायत समितीचे अध्यक्ष विद्यमान आमदार संतोष दानवे यांचे स्वागत केले.

बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे यांनी अध्यक्षीय भाषणात अहवाल वर्षात बँकेच्या आर्थिक स्थितीमधील विविध बाबींत झालेल्या प्रगतीची माहिती सभागृहात सांगितली. बँकेने बँकेच्या सर्व खातेदारांना मिस कॉल मोबाईल क्रमांकाद्वारे खात्यावरील शिल्लक जमा रक्कमेचा तपशिल मिळविणेची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच बँकेच्या सीबीएस नेटवर्क मध्ये सायबर सेक्युरिटी ऑपरेशन- सेंटरच्या सुरक्षात्मक व नियंत्रणात्मक बाबींची कार्य अंमलबजावणी करीत आहे.यामुळे बँकेच्या खातेदारांची बँके कडील खाती सायबर हल्ल्यापासुन 'सायबर सुरक्षित ' आहेत, तसेच बँकेच्या सर्व शाखांच्या राऊटरमध्ये 'फायरवॉल' या सुरक्षात्मक उपकरणाद्वारे बँकेच्या सीबीएस नेटवर्क मध्ये ' बँकेचे व्यवहार करणेचे अधिकार असलेले बँकेचे अधिकृत कर्मचारी, अधिकारी, बँकिंग सॉफ्टवेअर, नेटवर्क तंत्रज्ञ यांच्या व्यतिरिक्त इतर, अनोळखी, ओपन इंटरनेट ई. यांना पुर्णतः शिरकाव प्रतिबंधीत केलेला आहे, अशी सभेस माहिती देऊन बँकेच्या आर्थिक प्रगती बाबतची सभेस माहिती दिली.

यात बँकेस सन २०२५ अखेर ढोबळ नफा रु.१७.१५ कोटी झालेला असून निव्वळ नफा रु.८.६७ कोटी झालेला आहे. बँकेस गत १० वर्षापासून सतत 'ब' ऑडीट वर्ग प्राप्त करीत आहे, तर नाबार्ड तपासणीमध्ये सन २०१९ पासून 'ब+' वर्ग प्राप्त होत आहे.बँकेस सी.आर.ए.आर. चे प्रमाण ९ टक्के आवश्यक आहे. तर सन २०२५ मध्ये १९.९७ टक्के हे प्रमाणराखलेले आहे. बँकेचे नेटवर्थ सन २०२४ मध्ये रु.६२.१८ कोटी होते. यामध्ये रु.२१.४४ कोटीने वाढ होऊन सन २०२५ अखेर रु.८३.६२ कोटी झाले आहे. सन २०२४ मध्ये बँकेचा संचित तोटा रु.६.६० कोटी होता, तर सन २०२५ अखेर संचित तोटा 'निरंक' होऊन बँकेस निव्वळ नफा

रु.२.०७ कोटी झालेला आहे.बँकेच्या ठेवी सन २०२४ मध्ये रु.५१६.३५ कोटी होत्या तर सन २०२५ अखेर रु.७२.१३ कोटीने वाढ होऊन बँकेच्या एकुण ठेवी रु.५८८.४८ कोटी पर्यंत वाढलेल्या आहेत. बँकेची वसुली सन २०२५ अखेर रु.४०.०० टक्के आहे. सन २०२४ मध्ये बँकेची गुंतवणुक रु.२२९.९६ कोटी होती. तर सन २०२५ अखेर रु.३०५.०८ कोटी आहे. बँकेच्या गुंतवणुकी मध्ये रु.७५.१२ कोटीने वाढ झालेली आहे. बँकेस प्रैंटीयर को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन या देश पातळीवरील संस्थेमार्फत बँकेस सलग ६ वर्षापासून अॅवार्ड (पारितोषीके) प्राप्त होत आहे. सन २०२५ मध्ये बँकेस नुकतेच 'लिडरशिप अवार्ड- हेड ऑफ द आय. टी.' व ' बेस्ट पेमेंट ट्रान्सफॉर्मेशन ' या क्षेत्र मध्ये बँकेच्य उल्लेखनिय कामगिरी बद्यल बँकेची अवॉर्ड (पारितोषका) साठी निवड झालेली आहे.

आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे बँक सलग ५ वर्षापासून नियमित कर्ज परतफेड करणार्या शेतकरी सभासदास $10k^2$ वाढीव कर्ज वितरण करीत आहे.बँकेच्या खातेदारांना त्यांच्या बचत खात्यातील जमा शिल्लक रक्कमेचा तपशिल त्वरीत मिळण्यासाठी मिस कॉल सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.



बँकेने सीबीएस नेटवर्क मध्ये(सी-सॉक) सायबर सेक्युरिटी ऑपरेशन सेंटरद्वारे बँकेच्या ग्राहकांना सायबर सुरक्षा सेवा पुरवित आहे. बँकेकडे गत ३५ वर्षापासुन संचित असलेला तोटा बँकेने मार्च २०२५ अखेर निरंक केलेला आहे. तसेच सन २०२५-२६ करीता बँकेकडे रु. २.०७ कोटी नफा शिल्ल आहे. गत प्रदिर्घ काळानंतर बँक निव्वळ नफयात आली आहे. बँकेचे विद्यमान संचालक मंडळांने

वेळोवेळी घेतलेले सकारात्मक निर्णस व सन २०१० पासुन कै. अंकुशराव टोपे साहेब यांनी घालुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व खर्चात काटकसर तसेच बँकेच्या उत्पन्नात भरीव वाढ करुन बॅक निव्वळ नफयात आणली आहे व यापुढे बॅक सतत नफ्यात राहील, यासाठी बँकेचे संचालक मंडळ प्रयत्नशिल आहे, अशी सभेस माहिती देऊन बँकेचे ग्राहक, खातेदार व ठेवीदार यांच्यासाठी बँकेमार्फत अंमलात आणल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची सभेस माहिती दिली. बँकेने शेतकरी जनता अपघात विमा :- बँकेने सन २०२४ मध्ये जिल्हयातील चालुबाकी कर्जदार शेतकर्यांसाठी नाममात्र विमा हप्त्यात एक वर्ष कालावधीसाठी रु.२.०० लाखांचा अपघाती विमा कंपनी मार्फत उपलब्ध करुनदिलेला आहे. सन २०२५-२६ च्या हंगामात बँकेने या योजनेत जिल्हयातील जवळपास ४७,९६५ नियमित कर्ज परतफेड करणार्या चालुबाकी कर्जदार शेतकरी सभासदांचाविमा उतरविण्यात आलेला आहे. बँकेने शेतकर्यांना अपघाती विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना :- महाराष्ट्रशासनाच्या 'मुख्यमंत्री लाडकी बहिण ' योजने अंतर्गत जिल्हयातील शहरी,ग्रामिण भागातील महिलांचे बचत खाते शुन्य बॅलन्स मध्ये उघडण्याचा निर्णय सर्वप्रथम जालना बँकेच्या संचालक मंडळाने घेऊन तशी सुविधा जिल्हयातील महिला भगिनींना सर्व शाखां मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. यांस महिला भगिनीं मार्फत मोठा प्रतिसाद मिळत आहे. या योजने अंतर्गत बँकेच्या ६३,५०८ लाभार्थी महिला खातेदारांच्या खाती रक्कम जमा करण्यात आली आहे. बॅकेत ए.बी.बी. (एनी बँच बँकिंग) सुविधेस गतीमान करण्यात आलेः- बँकेचे खातेदार आता आपल्या मुळ शाखेतील खात्यावर बँकेच्या ६४ शाखांपैकी कोणत्याही शाखेतुन रक्कमेचा भरणा अथवा रक्कम काढण्याचा कोणताही व्यवहार

करु शकतात. तसेच सर्व शाखां मधुन आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. बँकेच्या खातेदारांना त्यांच्या खात्यावरील नांवे अथवा जमा रक्कमेच्या व्यवहाराचा तपशिल त्यांच्या मोबाईलवर एस.एम.एस.द्वारे दिला जात आहे. बैंक खातेदारांना त्यांच्या रक्कमा इतर बँकांतील खातेदारांना पाठविणेसाठी शाखास्तरावर ' आय.एम.पी.एस.' (ईमिजियट मोबाईल पेमेंट सिस्टीम) बँच ट्रान्झक्शन सुविधा उपलब्ध करुन देत आहे.बँकेचा खातेदार त्याच्या मागणीनुसार बँकेच्या शाखेद्वारे इतर बँकांचे खातेदार यांच्या खात्यात रक्कमा वर्ग करणेसाठी बँक सीबीएस सिस्टीम मध्ये 'आय.एम.पी.एस. ' बँच ट्रान्इक्शन सुविधा बॅकेच्या सर्व शाखास्तरावर उपलब्ध करुन देत आहे, ज्यामुळे बँकेच्या खातेदारांना त्यांच्या रक्कमा पाठविणेसाठी 'आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी.' साठी इतर व राष्ट्रीयकृत बँकांत जाण्याची गरज राहणार नाही. बँकेच्या शाखास्तरावरुन खातेदाराच्या मागणी नुसार त्यांच्या रक्कमा इतर बँकांतील खातेदारांना सरळ जमा करण्यात येतील.

बँकेतील प्रत्येक खातेदाराच्या बँकेतील रु.५.०० लाखा पर्यतच्या कोणत्याही प्रकारच्या ठेवी विमा संरक्षणाद्वारे सुरक्षित :- बॅकेतील खातेदारांच्या सर्वप्रकारच्या ठेवीचा रु.५.०० लाखा पर्यतच्या ठेव रक्कमेचा बँके मार्फत विमा काढण्यात आला आहे.

यापोटी बँक ही विमा कंपनीस रु.७०.०० लाख विमा हप्ता विमा कंपनीस भरणा करीत आहे. सदरील ठेव विमा संरक्षणामुळे बँकेकडील ठेव रक्कमे बाबत बँकेचे ठेवीदार आश्वस्त असुन त्यांची ठेव रक्कम विम्याने सुरक्षित आहे.बॅकेचा गत ३४ वर्षा पासुनचा सततचा संचित असलेला तोटा मार्च २०२५ अखेर निरंक झाला आहे.:- बँकेस सन १९९१ पासुन म्हणजे जवळपास गत ३५ वर्षापासुन बँकेकडे सततचा संचित असलेला तोटा बॅक मार्च २०२५ अखेर संपुर्ण निरंक केलेला आहे. सन २०२५-२६ साठी रु.०२.०७कोटी नफा शिल्लक आहे. तसेच यापुढे यापुढील कालावधीत बॅक कायम नफयात राहील किंबहुना नफ्यात विक्रमी वाढ करील, असे प्रयत्न बँकेच्या संचालक मंडळाद्वारे करण्यात येत आहेत. बँकेने कोअर बँकीग सोल्युशन (सीबीएस) संगणकीय प्रणालीद्वारे ग्राहकांना अनेकविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. बँकेस ठेवी, अनुदान, कर्ज अथवा ईतर मार्गाने मिळणारा निधी बॅक जिल्हयातील शेतकरी सभासदांच्या आर्थिक गरजा पुर्ण करणे व जिल्हयाच्या सर्वांगिण विकासा साठी उपयोगात आणीत आहे.

करीता जिल्हयातील ठेवीदार, खातेदार व कर्जदार सभासदांनी आपले सर्व प्रकारचे व्यवहार जिल्हा बँकेमार्फत करुन आपल्या ठेवी जिल्हा बँकेतच ठेवाव्यात, आपल्या कडील कर्जाची नियमित परतफेड करुन व्याज परतावा सवलतीचा लाभ घेणे, खातेदाराची केवायसी पुर्तता, कर्जदारांची अपुर्ण भागधारणेची पुर्तता करणे क्रमप्राप्त आहे. करीता सर्व सभासद बंधूनी बँकेस सहकार्य करावे, अशी विनंती बँकेचे अध्यक्षांनी उपस्थित सर्व सदस्यांना केली आहे.बँकेच्या ४२ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेस माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन करतांना बँकेच्या आर्थिक प्रगती बाबत सांगतांना बँक ही मोठ्या आर्थिक अडचणीच्या काळातुन वाटचाल करीत बँक स्वंयपुर्ण होत असल्या बाबत समाधान व्यक्त करुन तसेच सहकारी संस्थांनी बँकेच्या कर्जवसुलीस प्राधान्य देऊन वाढ करावी तरच बॅक देखील संस्थांना कर्जवाटपात वाढ देऊ शकेल याबाबतचे सभेत अवाहन केले आहे.

तसेच जिल्हयातील सहकारी संस्था, सधन शेतकरी, व्यापारी व सर्व सामान्य शेतकर्यांनी बँकेकडे आपल्या ठेवी ठेऊन बँकेच्या प्रगतीमधुन जिल्हयातील शेती व्यवसाय, शेतकर्यांचा विकास साधावा, असेही त्यांनी सभेत सांगितले आहे. तसेच केंद्र शासन देशातील सहकारी संस्थांना आर्थिक बळकटी देणेसाठी अंमलात आणीत असलेल्या विविध योजनांची त्यांनी सभेत माहिती दिली, व प्रथम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी आपली आर्थिक परिस्थिती सुदृढ करावी, असे सहकारी संस्थांना अवाहन केले आहे. बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी बँकेच्या वार्षीक

सर्वसाधारण सभेस उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानुन बँकेचे अध्यक्ष यांचे परवानगीने सदरील सभा संपल्याचे जाहिर केले.

# विशेष पोलीस महानिरीक्षकानी जालना आडवा बैठक घेऊन उत्कृष्ट कामगिरीबद्दल जालना पोलिसांचा गौरव

**आताच एक्स्प्रेस**

**जालना /सोपान वाघमारे/**जिल्हा पोलीस प्रशासनाचं महानिरीक्षक पोलीस मिश्रा जालना दि १२ ( रोजी बैठक घेऊन दहशतवाद विरोधी पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेने जिल्ह्यात अंमली पदार्थासह अवैध धंद्याच्या करोधात अधिक प्रवाभीपणे काराव्या कराव्यात, अशा शब्दात विशेष बोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी शुक्रवारी १२ सप्टेंबर रोजी जिल्हा पोलिसांना सुचना दिल्या. तसेच जालना जिल्हा पोलीस प्रशासन आंदोलन मोर्चे तसेच गुटखा नाफयावर कारवाई लुटमार चोरी गांजा अशा इतर धडाकेबाज कारवाई केल्यामुळे बोलीस महानिरीक्षक मिश्रा यांनी जालना जिल्हा पोलीस प्रशासन कौतुक केलं. जालना जिल्हा पोलीस दलाच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी मिश्र हे जालना दौयावर आले असता त्यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात आढावा बैठक घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक



आयुष नोपाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रारंभी मिश्र यांनी मराठा आंदोलन उत्कृष्टरीत्या हाताळल्याबद्दल आणि गणेशोत्सव व इतर सण शांततेत साजरे करण्यासाठी प्रयत्न केल्याने पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधिक्षक यांच्यासह पोलीस अधिकाऱ्यांचा प्रमाणपत्र देवुन गौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, वाहन बोरी यासह प्रलंबीत गुन्ह्यांचा आढावा घेतुन गुन्हे लवकरातलवकर निकाली काढण्यासाठी अधिक चांगल्या प्रकारे काम करावे, असे सांगितले. तसेच एनडीपीएस विशेष पथकाची स्थापना करण्यात आली असून, त्यासाठी निश्चित करण्यात आले. मिश्र यांनी केले.

उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांसह प्रभारी अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागात अधिकाधिक गावांना भेट देवुन गरज असेल तेथे कॅमेरे लावण्याबाचत जगनाजगृती करावी आणि नविन कायद्याची अंमलबजावणी करतांना दोषसिध्दीचे प्रमाण वाढवावे, असे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी त्यांच्या हस्ते नागरीकांसाठी आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना व इतर कागदपत्रे गहाळ झाल्यानंतर त्याची तक्रार नोंदविण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या अॅपचे अनावर करण्यात आले. तसेच २५ स्कॅनर, २१ मोचाईल टॅब, ४ संगणक, १ टॅपटॉपचे पोलिसांना वितरण करण्यात आले. यावेळी विभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती होते.

# स्व. किशोर अग्रवाल यांच्या स्मृत्यर्थ प्लास्टिक संकलनासाठी वाहन भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकीसाठी सदैव अग्रेसर असलेले युवा उद्योजक



राहुल अग्रवाल यांनी वडील स्व. किशोरजी अग्रवाल यांच्या स्मृत्यर्थ रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या प्लास्टिक संकलन कार्यासाठी आधुनिक ई-वाहन भेट दिले. त्याचा लोकार्पण सोहळा १३ सप्टेंबर रोजी पार पडला.

प्रारंभी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी प्लास्टिक संकलन कार्याची माहिती देऊन, राहुल अग्रवाल यांनी एक वाहन उपलब्ध करून दिल्याने आमच्या प्लास्टिक संकलन व पर्यावरण संवर्धन कार्याला निश्चितच मोठे बळ प्राप्त झाल्याचे सांगून त्यांचे आभार व्यक्त केले. राहुल अग्रवाल म्हणाले की, रोटरी क्लब च्या माध्यमातून प्लास्टिक संकलन आणि पर्यावरण संवर्धनाचे मोठ्या प्रमाणात कार्य होत असून, त्यास हातभार लागावा, हा उद्देश समोर ठेवून उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या या नव्या वाहनामुळे प्लास्टिक संकलन कार्यास गती मिळेल. जालना शहरात प्लास्टिक संकलन आणि पुनर्वापराला चालना मिळून पर्यावरण संवर्धनाचा प्रभाव वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी स्व. किशोर अग्रवाल यांच्या समाजसेवी कार्याचा गौरव करत त्यांना आदरांजली अर्पण केली. डॉ. राजेश सेठिया यांनी राहुल अग्रवाल यांनी पर्यावरण क्षेत्रासाठी केलेल्या योगदानाची माहिती दिली.

कार्यक्रमाला सृष्टी फाउंडेशनच्या माजी अध्यक्ष संध्या जहागिरदार, सचिव जयश्री कुंजगे, डॉ. नितीन खंडेलवाल, विवेक मणियार, जयेश पहाडे, डॉ. सुमित्रा गादिया, सौ. स्मिता भक्कड, सुयोग सावजी, जगदीश समदानी, अभय मेहता, संजय राठी, कैलाश बियाणी, संजय दाड, प्रदीप मुथा, अशोक शर्मा, प्रदीप तोतला, विनोद पाटणी यांच्यासह राहुल अग्रवाल यांचा मित्रपरिवार, अद्रिक क्लबचे सदस्य तसेच रोटरी क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार पंकज लड्डा यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813